# महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई

## शासकीय/ निमशासकीय सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने नेमणूक करणेबाबत

महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई येथे निविदा प्रक्रिया, औषधे, वैद्यकीय उपकरणे व इतर वैद्यकीय साहित्याची खरेदी, देयके, प्रशासकीय कामकाज, बैठका इत्यादी विवक्षित कामकाजासाठी शासकीय/निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अनुभवी अधिकाऱ्यांची **करार पद्धतीने नियुक्ती** करण्यात येणार आहे.

सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. १०.०६.२०२५ मधील तरतुदीनुसार पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**१. पदांचा तपशील -**

| अ.क्र. | पदाचे नाव / कामाचे स्वरूप | आवश्यक पात्रता / अनुभव | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | लेखा अधिकारी | विशेष अर्हता अथवा संबंधित क्षेत्रातील किमान ३ वर्षांचा अनुभव | ०२ |
| २ | औषध निर्माण अधिकारी | विशेष अर्हता अथवा संबंधित क्षेत्रातील किमान ३ वर्षांचा अनुभव | ०२ |
| ३ | प्रशासकीय अधिकारी | विशेष अर्हता अथवा संबंधित क्षेत्रातील किमान ३ वर्षांचा अनुभव | ०१ |

**२. पात्रता व अटी -**

१. उमेदवार हा शासकीय/निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेला अधिकारी असावा.

२. विशेष अर्हता अथवा संबंधित पदाच्या कामकाजाचा किमान ३ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

३. उमेदवार शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

४. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

५. नियुक्तीचा कालावधी एका वेळी कमाल १ वर्षाचा राहील. आवश्यकतेनुसार शासन निर्णयातील तरतुदीनुसार दरवर्षी नूतनीकरण करता येईल. एकूण नियुक्ती कालावधी कमाल ३ वर्षांपर्यंत राहील.

६. नियुक्त व्यक्ती सामान्यतः वयाच्या ६५ वर्षापर्यंत कार्यरत राहू शकेल. विशेष परिस्थितीत सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने सेवा पुढे सुरू ठेवता येईल. तथापि, कोणत्याही परिस्थितीत वयाची ७० वर्षे पूर्ण झाल्यानंतर सेवा देता येणार नाही.

७. प्रस्तावित नियुक्ती ही नियमित मंजूर पदावर नसून केवळ विवक्षित कामकाजासाठी सेवा करार पद्धतीने करण्यात येईल.

८. नियुक्त व्यक्तीस कोणतेही प्रशासकीय किंवा वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.

९. सदर नियुक्तीमुळे नियमित सेवेत समाविष्ट होण्याचा किंवा कायमस्वरूपी नियुक्तीचा कोणताही हक्क निर्माण होणार नाही.

१०. मानधन व इतर अनुज्ञेय भत्ते हे सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १०.०६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार निश्चित करण्यात येतील.

११. निवास, प्रवास व दूरध्वनी भत्त्यांची एकत्रित रक्कम शासन निर्णयातील तरतुदीनुसार मासिक मानधनाच्या जास्तीत जास्त २५% पर्यंत अनुज्ञेय राहील.

१२. पात्र उमेदवारांची नामिकासूची (Panel) तयार करण्यात येईल व प्राधिकरणाच्या आवश्यकतेनुसार त्यामधून करार पद्धतीने नियुक्ती करण्यात येईल.

१३. उमेदवारांची निवड करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई यांच्या अधिनस्त राहिल.

१४. सदर उमेदवाराच्या सेवा पुर्वसूचना न देता समाप्त करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई यांना राहतील.

१५. एखाद्या अर्जदाराने एमपॅनलमेंट बाबत प्रत्यक्ष / अप्रत्यक्षपणे दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१६. जाहिरातीत प्रसिध्द करण्यात आलेल्या पदाची संख्या कमी जास्त करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई यांना राहतील.

१७. सदर निवडप्रक्रिया कोणत्याही क्षणी स्थगित करणे/ तहकूब करणे / रद्द करणे इत्यादिचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई यांनी राखून ठेवले आहेत.

३. **अर्ज करण्याची पद्धत -**

- संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द केलेल्या दिनांकापासून इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज **दिनांक १५ /०९/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत** विहित कागदपत्रांसोबत (साक्षांकित प्रती) मुख्य कार्यकारी अधिकारी, यांचे नावे महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई आरोग्य भवन, १ ला मजला, सेंट जॉर्जेस रूग्णलाय आवार, मुंबई-०१ येथे हस्तपोच सादर करावा.
- सदर पदाची जाहिरात व अर्जाचा नमुना प्राधिकरणाचे **संकेतस्थळ** (https:// mmgpa. maharashtra. gov.in) **यावर प्रसिध्द करण्यात येईल**.
- प्राप्त अर्जाची छाननी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र झालेल्या उमेदवारांची यादी प्राधिकरणाच्या **सूचना फलकावर व संकेतस्थळ** (https://mmgpa.maharashtra.gov.in) **यावर प्रसिध्द करण्यात येईल**.

**टीप :-** अपूर्ण अर्ज, अंतिम मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज अथवा आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

सही/-

०९/०९/२६

(महाव्यवस्थापक (प्रशासन))

दिनांक :- / /२०२६

महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई

## महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई

## सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची करार पद्धतीने नियुक्ती करण्यासाठी अर्जाचा विहित नमुना

---

**१. अर्जदाराचे संपूर्ण नाव :**

...............................................................................................................

**२. सध्याचा पत्रव्यवहाराचा पत्ता :**

...............................................................................................................

...............................................................................................................

**३. मोबाईल क्रमांक :** ...................................................................

**४. ई-मेल आयडी :** ..............................................................................

**५. जन्मतारीख :** _____ / _____ / _______

**६. सेवानिवृत्तीच्या दिनांकास वय :** ................. वर्षे

**७. ज्या पदासाठी अर्ज करीत आहात :**

☐ लेखा अधिकारी ☐औषध निर्माण अधिकारी ☐ प्रशासकीय अधिकारी

**८. शासकीय/निमशासकीय सेवेमधील तपशील :**

| अ.क्र. | कार्यालय/विभागाचे नाव | पदनाम | सेवाकाल (पासून-पर्यंत) | एकूण अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

**९. सेवानिवृत्तीचा तपशील :**

सेवानिवृत्तीचा दिनांक : _____ / _____ / _______

सेवानिवृत्तीचे पदनाम : ........................................................................

सेवानिवृत्तीचे कार्यालय : .......................................................................

**१०. शैक्षणिक पात्रतेचा तपशील :**

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | विद्यापीठ/संस्था | उत्तीर्ण वर्ष | श्रेणी/टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

**११. संबंधित पदाच्या कामकाजाचा अनुभव :**

...............................................................................................................

...............................................................................................................

...............................................................................................................

**१२. संबंधित क्षेत्रातील एकूण अनुभव :** ................. वर्षे

**१३. संगणकाचे ज्ञान / संबंधित तांत्रिक कौशल्ये :**

....................................................................................................................

....................................................................................................................

**१४. यापूर्वी करार पद्धतीने सेवा बजावली असल्यास तपशील :**

....................................................................................................................

....................................................................................................................

**१५. सध्या कोणत्याही शासकीय/निमशासकीय संस्था/संस्थेमध्ये कार्यरत आहात काय?**

होय / नाही

होय असल्यास तपशील : ....................................................................................

**१६. अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा तपशील :**

- शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे -
- सेवाकाल/अनुभव प्रमाणपत्र -
- सेवानिवृत्ती आदेशाची प्रत -
- जन्मतारीख/वयाचा पुरावा -
- आधारभूत ओळखपत्राची प्रत -
- संबंधित पदाच्या अनुभवासंबंधी कागदपत्रे -
- इतर आवश्यक कागदपत्रे - .......................................................................

**घोषणा**

मी याद्वारे घोषित करतो/करते की, वरील अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती खरी व बरोबर आहे. सदर माहिती किंवा कागदपत्रांमध्ये कोणतीही बाब चुकीची/खोटी आढळल्यास माझी उमेदवारी/करार नियुक्ती रद्द करण्याचा अधिकार महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरणास राहील, याची मला पूर्ण जाणीव आहे.

तसेच, सदर करार पद्धतीची नियुक्ती ही शासनाच्या लागू नियम व अटींच्या अधीन राहील व त्याद्वारे मला नियमित शासकीय सेवेत कायमस्वरूपी नियुक्तीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही, हे मला मान्य आहे.

**ठिकाण :** ..........................................

**दिनांक :** _____ / _____ / २०२६

**अर्जदाराची स्वाक्षरी :** ............................................................

**अर्जदाराचे नाव :** .......................................................................